| महाराष्ट्र पोलीस | **पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**<br>**प्रेसनोट** | 2025<br>CB/ 29/2025 |
|---|---|---|
| **गुन्हे शाखा, नवी मुंबई** | | **दिनांक २१.०५.२०२५** |

## ''उलवा पोलीस ठाणे हद्दीतील महिलेच्या गंभीर खुनाची उकल''

---

दि.१८/०५/२०२५ रोजी उलवा पोलीस स्टेशन हद्दीत अलविना किशोर खंगार सिंग, वय-२७ वर्षे हिचा अज्ञात इसमाने गळा कापुन खुन केल्याबद्दल तिचा पती किशोर सिंग याने उलवा पोलीस स्टेशन येथे दिलेल्या फिर्यादीवरून गु.र.क्र.२१८/२५, कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, कक्ष-२, पनवेल नवी मुंबई हे करीत होते.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन श्री. मिलींद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.संजय येनपुरे, पोलीस सह आयुक्त, श्री. दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे),श्री. प्रशांत मोहिते, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -२,पनवेल यांनी गुन्हे शाखेला व उलवे पोलीस स्टेशनला सदर गुन्हा तात्काळ उघडकीस आणणेकरीता आदेशित केले होते.

सदर गुन्हयाच्या घटनास्थळी आरोपींबाबत काहीएक सुगावा नव्हता व घटना पाहणारे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उपलब्ध नव्हते. तसेच घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज देखील अस्पष्ट होते. तथापी फिर्यादी व मृत महिलेशी संबंधित इसमांकडे कौशल्यपुर्ण चौकशी करुन व गुन्हयाचा तांत्रिक पध्दतीने तपास करुन गुन्हयाची उकल करण्यात गुन्हे शाखेस यश आले आहे.

नमुद गुन्हयातील फिर्यादी किशोर सिंग यानेच त्याच्या ओळखीच्या १) अलिशा धनप्रकाश त्यागी २) चरणजित फतेसिंह कौर उर्फ डिंपल यांचेशी संगनमत करून गुन्हयात निष्पन्न झालेले २ पाहिजे आरोपींना परराज्यातुन बोलावुन घेवुन ६,००,०००/- रुपये रक्कम त्यांना सुपारी म्हणुन देवुन, फिर्यादीने त्याची पत्नी अलविना किशोर खंगार सिंग हिचा खुन करुन घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास उलवा पोलीस ठाणे करीत आहे. पाहिजे आरोपींना अटक करण्यासाठी गुन्हे शाखा व उलवा पोलीस ठाणेचे संयुक्त पथक नेमण्यात आले आहे. गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे खालीलप्रमाणे :-

१)किशोर सिंग खंगारसिंग राजपुत, वय ३० वर्ष, रा. विजय लक्ष्मी टॉवर, प्लॉट नं १९, से.नं ०५ उलवा, नवी मुंबई

२) अलिशा धनप्रकाश त्यागी, वय ३८वर्ष मुळ रा. गुगनामोड, गल्ली नं ७, गाझीयाबाद राज्य उत्तरप्रदेश

३) चरणजित फतेसिंह कौर उर्फ डिंपल, वय ३४ वर्ष, मुळ रा. पतापुर खांदे, ता.तरनाताल, जि.अमृतसर, राज्य - पंजाब

यांना दिनांक २१/०५/२०२५ रोजी १७:४५ वा अटक करण्यात आली असुन त्यांना मा. न्यायालयात हजर केले असता त्यांना दि.२७/०५/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर करण्यात आली आहे.

सदरचा गुन्हा हा सहायक पोलीस आयुक्त, अजयकुमार लांडगे, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/ उमेश गवळी, सपोनि/ प्रविण फडतरे, पोउपनिरी/ अभयसिंह शिंदे तसेच गुन्हे कक्ष-२ कडील पोलीस अंमलदार यांनी उघडकीस आणला आहे.

★★★★★★★★★★